# दोन वर्षात दीडशे कोटीचा सिमेंट रोड, नाली शहरात केलेला विकास कागदावरच नीता अंधारे व गणेश पगारेंनी लुटली!

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

**न.प.चा भागवत जाधव स्वच्छतेच्या नावावर कमवू लागला वाचा पुढील अंकात!**

■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – १८० ■ बुधवार दि.१९ मार्च २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 180 ■ Wednesday Dt. 19 March 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

# अंधारे बाई, गणेश पगारेंनी सोन्याचं अंडा देणारी कोंबडी बीड नगरपरिषदेतील क्षीरसागरांची एक हाती सत्ता संपवली

## बीड नगर परिषदेमध्ये क्षीरसागराची सत्ता संपवण्याचे मोठ-मोठ्या विरोधकांना जमलं नाही निता अंधारे व गणेश पगारे म्हणतात क्षीरसागरांची नगरपरिषदेतील दादागिरी आम्ही संपवली?

- आष्टीचे आ. सुरेश धस तर परळीतून वाल्मीक कराड चे कार्यकर्ते तुपाशी आणि आ. संदीप क्षीरसागर व डॉ. योगेश क्षीरसागराचे कार्यकर्ते उपाशी?
- बीड शहरातील अनेक भागांमध्ये घाणीचे साम्राज्य; नीता अंधारे फक्त टक्केवारी आणि गुत्तेदारीमध्ये?
- गणेश पगारेच्या माध्यमातून कोट्यावधी रुपये कमवून नातेवाईकांच्या नावावरती घेतलेली प्रॉपर्टी जनतेसमोर येण्याची शक्यता?
- नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा विभागातील कोट्यावधी रुपयाचा घोटाळा गणेश पगारेंच्या आशीर्वादाने?
- अनेक गुत्तेदार तुपाशी बीड शहरातील जनतेची तहान अजूनही भागलेली नाही!
- बीड शहरातील १७ मुख्य रस्ते मंजुरीचा प्रस्ताव लालफितीमध्ये अडकला
- नगर विकास विभागाचा कानाडोळा; विकासाला ब्रेक
- मुख्याधिकारी नीता अंधारे या खड्डे पडलेल्या रस्त्यावरून नगरपालिकेत येतात त्यांना दिसत नाही का?
- पालकमंत्री अजितदादा, यांच्याकडून विधानसभेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनानंतर मंजुरी मिळणार का?

बीड । प्रतिनिधी

बीड नगरपालिकेने एक वर्षापूर्वी बीड शहरातील ११० कोटी रुपयांच्या ४० फूट रुंदीच्या १७ मुख्य रस्त्यांच्या मंजुरीसाठी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत राज्याच्या नगर विकास विभागाकडे पाठवलेला प्रस्ताव लालफितीत अडकला आहे. या रस्त्यांना उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडून विधानसभेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनानंतर मंजुरी मिळण्याची शक्यता आहे. शहरातील नगर रोड ते पालवन चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते संतोषी माता मंदिर, राजुरी वेस– बलभीम चौक– माळीवेस, बलभीम चौक ते दगडीपुल, थिगळे कॉम्पलेक्स – जालना रोड, जिजामाता चौक ते मसरतनगर अशा एकूण शहरातील १७ अत्यंत महत्त्वाच्या प्रमुख रस्त्यांचा प्रस्ताव मागील एक वर्षापूर्वी बीड नगरपालिकेने नगर विकास विभागाकडे पाठवला आहे. १७ रस्ते ४० फूट रुंदीचे होणार असून त्यासाठी ११० कोटी रुपये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजनेतून पूर्ण होणार आहेत.







> ३५ ते ४० वर्षापासून एक हाती क्षिरसागर यांच्या बंगल्याची सत्ता बीड नगर परिषदेवर होती. त्याला संपविण्याचे काम मुख्याधिकारी नीता अंधारे गणेश पगारे यांनी केलं मात्र नीता अंधारे व गणेश पगारे यांनी डॉ.योगेश क्षीरसागर व आ. संदीप क्षीरसागर यांच्या कार्यकर्त्यांना उपाशी ठेवत वाल्मीक कराड व आ. सुरेश धस यांचे कार्यकर्ते बीड नगर परिषद मध्ये गुत्तेदारीच्या माध्यमातून पोहोचले आहेत. तर यामध्ये बीड शहरांमध्ये फक्त कागदावर विकास झालेला चित्र स्पष्ट झालेलं आहे. त्यामुळे मोठा आंदोलन उभा होणार असल्याचे सांगितले जात आहे. मुख्याधिकारी नीता अंधारे व गणेश पगारे यांचं व यांच्या नातेवाईकांच्या प्रॉपर्टी खरेदी केलेली लवकर पुढील अंकांमध्ये वाचकांच्या समोरील येईल?

### अधिवेशनानंतर मंजुरी

रस्त्यांना नगर विकास विभागाची मंजुरी मिळावी म्हणून आतापर्यंत तीन वेळा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे पाठपुरावा केला आहे. माझ्यासह गटनेते फारूक पटेल, नगरसेवकांचे शिष्टमंडळ व कार्यकर्ते भेटलो आहोत. अर्थसंकल्पीय अधिवेशनानंतर १७ रस्त्यांना नगर विकास विभागाची मंजुरी मिळणार आहे.

–अमर नाईकवाडे, नगरसेवक

### हद्दवाढ झालेल्या भागातील रस्तेही प्रतीक्षेत

शहरातील गांधीनगर, हनुमाननगर, स्वराज्यनगर, शिंदेनगर, फुलाईनगर, सोमेश्वरनगर, धानोरा रोड पश्चिम बाजू, अंकुशनगर या नगरपालिकेच्या हद्दीत येणाऱ्या रस्त्यांची दुर्दशा सध्या कायम आहे.

### दोन वर्षांत १४० कोटींचे रस्ते

मागील २ वर्षांत महाअभियान अंतर्गत टप्पा क्रमांक १ मधून ७० कोटी व टप्पा क्रमांक २ मधून ६९ कोटी अशा एकूण १४० कोटी रुपयांची ६० फूट रुंदीचे सिमेंट रस्त्यांची व नालींची कामे करण्यात आली आहेत.

शिवरायांचा पुतळा ते पालिकेच्या रस्त्याची दुर्दशा बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज ते बीड नगरपालिका पर्यंतचा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या हद्दीत येतो. मागील दोन वर्षांत केवळ निधी अभावी हा रस्ता रखडला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून हा रस्ता होत नसल्याने नगरपालिकेने केवळ कार्यालयासमोरील सिमेंट रस्ता करून घेतला आहे. मुख्याधिकारी नीता अंधारे या खड्डे पडलेल्या रस्त्यावरून नगरपालिकेत येतात परंतु त्यांनी सुध्दा रस्त्याकडे दुर्लक्ष केले आहे. त्यांना हे दिसत नाही का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

# एक्स्ट्रा आयटमच्या नावाखाली मनीषा पलांडे मॅडम एमजीपी कार्यालय बीडकडून कोट्यवधीची टक्केवारी ठरली का?

## मनीषा पलांडे मॅडम, गजानन खराटे दीड कोटीच्या एक्स्ट्रा आयटमची मंजुरी दिली आहे का दिली असेल तर मीडियाला त्याची माहिती द्या?

- बीडच्या एमजीपी कार्यालयात खराटे ठाकूरचा नंगानाच कोट्यावधी गायकवाड नावाच्या गुत्तेदाराच्या घशात?
- एमजेपी कार्यालयात साहित्य जास्त झाले आहे पण नवीन व्यकी किवा कर्मचारी हे हे मोकळे चालू फिरू शकत नाहीत. पण नव्याने आणलेले साहित्य हे निकृष्ट दर्जाचे आहे का नाही याची पडताळणी मनिषाताई पलांडे यांनी करणे आवश्यक आहे.





बीड । प्रतिनिधी

**महाराष्ट्र शासनाला कसे लुटायचा आणि कोणाच्या माध्यमातून लुटायचं आताही बीड जिल्हा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालयातील खराटे नावाचे नव्याने आलेले अधिकारी आणि बीएस ठाकूर नावाचा अकाउंटंट यांनी मनीषा पलांडे मॅडम यांनाही कोट्यावधी रुपयाची टक्केवारी दिल्याची चर्चा सध्या एमजेपी कार्यालयामध्ये जोडधरत आहे याचाच एक भाग म्हणून आता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बीडच्या मालकीची इमारत नाळवंडीनाका पिंपळनेर रोड आदित्य कॉलेज जवळ असून शासकीय कामात अश्या अनियमितता होत आहे याचे जावलंत उधाहरण.**

१) रु १.१४ कोटीची मुळ प्रशासकीय मान्यता नसताना ठरावर १.१४ कोटीची बिल्डिंगचे टेंडर २०१९ मध्ये चुकीच्या पद्धतीने काढण्यात आले ?
२) टेंडरची मुदत २४ महिने करीता होती टेंडरचे कामे संपले आहे, पुन्हा घोडचूक करून अधिकारी यांनी कामे राहिले म्हणून त्याच ठेकेदार ला दिड कोटीचे भाग करून एक्सट्रा आयटमला चिरीमिरी घेऊन मंजुरी दिल्या.
३) १० लाखाच्या वरच्या कामांना ऑनलाईन ई निविदा प्रसिद्धी केली असती तर शासनाचा फायदा झाला असता.
४) पुन्हा आज ई निविदा ना काढता जवळपास तिन्ही ऑफिस ला फुर्निचर बनविणे म्हणून कोटीच्या जवळपास ऑफलाईन पद्धतीने गायकवाड ठेकेदार ला कामे दिले?
६) ठेकेदार श्री गायकवाड हे २०१९ चे काम २०२५ पर्यंत पूर्ण करीत नाही याला चिरीमिरी घेऊन मुदतवाढ वाढवून देण्यात आल्या.
७) बिल्डिंगच्या टेंडर १.१४ कोटी, एक्स्ट्रा आयटम १.५० कोटी ५ भाग करून, आता ऑफिस मध्ये फर्निचर आणुन टाकले, १५ लोक असतांना दुप्पट टेबल, खुर्च्या आणल्या निवळ शासनाच्या पैश्याचा गौरवपर होत आहे, ऑफिस मध्ये टेबल खुर्च्या कपात असतांना खरेदी करायची गरज का वाटली ? खराटे बीड जिल्हा सगडाच खरडून खायच्या तयारीत आहे
८) प्रभारी कार्यकारी अभियंता असल्याने कोणाला काय पाहिजे सांगा, दाम द्या सह्या घ्या.
९) ८ दिवस अदी ४.५० कोटी वाटल्या ज्यांनी दाम दिला त्यालाच पैशे, जलजीवन चे २५ योजनाला ४.५० कोटी वाटताना कोणता निकष लावण्यात आले.
१०) बीड उप अभियंता प्रभारी, बीड कार्यकारी अभियंता प्रभारी, संभाजीनगर अधीक्षक अभियंता प्रभारी, ४ रिटायर्ड नंतर अभियंत्याला घेलेते सगळे मिळून लुटून खाऊ? असा पवित्र महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग बीड येथील वातावरण आहे.

### एक्स्ट्रा आयटम कुठलीही मंजुरी नसताना काम चालू कसे झाले?

> एमजेपी कार्यालय बीडच्या एकूण कर्मचारी सख्या पंधरा ते विसर आणि टेबल खुर्ची तिनप्ट खरेदी केले. पण काही महिन्यापूर्वी नगर रोडवरील कार्यालय शिफ्ट करण्यात आले होते त्यावेळेस अनेक टेबल खुर्ची अनेक साहित्य करण्यात आले होते ते आता भंगारात टाकणार का?

# कोल्हारवाडी येथे शिवजन्मोत्सव सोहळा उत्साहात साजरा

बीड । प्रतिनिधी

शिवसेना तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन यांचे गाव असलेल्या कोल्हारवाडी ता.बीड येथे सालाबादप्रमाणे याही वर्षी तिथीनुसार श्रीमंत योगी छत्रपती शिवाजी महाराज यांचा शिवजन्मोत्सव सोहळा गावकऱ्यांनच्या वतीने मोठ्या थाटामाटात साजरा करण्यात आला. सकळी ८ वाजता महाराजांच्या प्रतिमेची पालखीतून जयजयकार करीत भव्य मिरवणूक काढण्यात आली, गावात सर्वत्र भक्तीमय वातावरणात झाले होते, महिलांनी आप आपल्या दारात व रस्त्यावर सडा व रांगोळी काढलया होत्या. अवघया परिसरात जय भवानी जय शिवाजी च्या गगनभेदी घोषणांनी दणाणून गेले होते. या मिरवणुकीत संपूर्ण गावातील पुरुष व महिला तसेच युवक सामील झाले होते. नंतर रक्तदान शिबीर घेण्यात आले. यामध्ये ५१ युवकांनी स्वयंस्फुर्तीने रक्तदान केले, दुपारी ४ ते ८ यावेळेत आलेल्या शिवभक्त व गावकरी मंडळी यांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.८ ते ९ यावेळेत शिवचरित्रकार रोहन नामदेव चव्हाण यांनी शिवचरित्रावर अत्यंत प्रभावी व्याख्यान करून लोकांना मंत्रमुग्ध केले. व ९ ते११ यावेळेत ह.भ.प. बबन महाराज बहिरवाळ यांचे सुंदर असे हरि किर्तन संपन्न झाले. शेवटी सिंघन अण्णा यांनी आलेल्या किर्तनकार, व्याख्याते, गायनाचार्य, सर्व शिवप्रेमी व गावकरी यांचे आभार व्यक्त करुन सर्वांनी असेच जीवाभावाने एकत्र राहुन शिवाजी महाराजांच्या विचारांशी एकनिष्ठ राहुन, आपल्या गावात दिवसेंदिवस महारांजची जयंती चालू रहावी अशी सदिच्छा केली. हा कार्यक्रम यशरवी करण्यासाठी संपूर्ण गाव एकवटुन कार्यक्रम यशरवी केला.



# नागपुरातील हिंसाचाराचा पीपल्स रिपब्लिकन पार्टीतर्फे तिव्र निषेध

## धार्मिक तेढ निर्माण करून सोहार्दतेला सुरंग लावण्याचा प्रयत्न : कवाडे

बीड । प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराज यांनी प्रगाढ बुद्धिमत्ता व युद्धकौशल्याच्या जोरावर स्वराज्य निर्मिती करून विश्वात त्यांची ख्याती आहे. त्यांच्याच पाऊलशात नवीन चेतना निर्माण केली. प्रगत, पुरोगामी, शक्तिशाली महाराष्ट्र घडवणाऱ्या छत्रपतींच्या राज्यात आज जातीय तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न काही समाजकंटक करीत आहे. सोमवारी नागपुरात औरंगजेबच्या निषेधार्थ झालेल्या आंदोलनानंतर दो समुदायात झालेल्या वादाचे रुपांतर दंगलीत झाले. यात निष्पाप नागरिकांसह पोलिस कर्मचाऱ्यांवरही हिंसाचार करण्यात आले. याशिवाय स्थानिकांच्या वाहनांची जाळपोळ करण्यात आली आहे.

राजकीय हेतूने राज्याचे वातावरण दुषित करण्याचा घाट होत आहे. धार्मिक तेढ निर्माण करून सोहार्दतेला सुरंग लावण्याचा प्रयत्न राज्यात होत असल्याचा आरोप पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष तसेच महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळाचे उपाध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) जयदीप भाई कवाडे यांनी केला. जयदीप कवाडे यांनी दंगल घडविणाऱ्यांवर कठोर कार्यवाही करण्याचे आवाहन सरकारला पत्राद्वारे केले आहे.



पुढे बोलतांना जयदीप कवाडे म्हणाले की, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या महायुती सरकारला बदनाम करण्याचा प्रयत्न सोमवारी नागपुरात झालेल्या हिंसाचारातून याची प्रचिती होत आहे. प्रत्यक्षात काल झालेली घटना अतिशय निंदनीय असून याचा पीपल्स रिपब्लिकन पार्टी तिव्र निषेध करत असल्याचेही जयदीप कवाडे म्हणाले. धार्मिक तेढ निर्माण करून राज्याच्या सोहार्दतेला सुरूंग लावण्याचा कुटील डाव आज विरोधी पक्ष करीत आहे. कोणतेही मुद्दे नसताना नागपुरात दंगली घडवून पाहायला मिळत आहे. दंगलच घडवून हिंसाचारचे लोन पसरविण्याचा प्रयत्न दगडफेक कारणाऱ्यानी सोमवारी नागपुरात आपल्याला पाहायला मिळाला. यामुळे सर्वसामान्यांना प्रचंड त्रास सोसावे लागले. अश्या घटना पुन्हा होऊ नये म्हणून सरकारने दक्षता बाळगण्याची गरज असल्याचेही जयदीप कवाडे म्हणाले.

# आ. मुंदडांनी वेधले केज मतदारसंघातील प्रश्नांकडे सभागृहाचे लक्ष

## व्हीआयपी विश्रामगृह, अंबाजोगाई शहर हद्दवाढ, केज येथे नगरपरिषद तर नेकनूरला नगरपंचायत, ग्रामीण रस्त्यांना क्रमांक देण्याची मागणी

केज । प्रतिनिधी

मतदारसंघाच्या आमदार नमिता मुंदडा यांनी सुरु असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात केज विधानसभा मतदारसंघातील अनेक प्रश्नांकडे सभागृहाचे लक्ष वेधले असून, आपल्या अभ्यासपूर्ण भाषणांत त्यांनी मतदारसंघातील ग्रामीण रस्त्याच्या मजबूतीकरणासाठी प्रत्येक रस्त्यांना क्रमांक देण्याची म्हत्वाची मागणी केली.

तसेच अंबाजोगाई नगरपरिषदेची हद्दवाढ, केज येथे नगरपरिषद तर नेकनूरला नगरपंचायत मंजूर करणे तसेच राज्य मार्ग आणि जिल्हा मार्गांची दुरुस्ती करणे, अंबाजोगाई, केज येथील व्हिआयपी विश्रामगृहासाठी निधी मंजूर करणे याबाबत मागण्या आपल्या भाषणातून लावून धरल्या आहेत. विकासाची दूरदृष्टी असलेल्या केज विधानसभा मतदारसंघाच्या आमदार नमिता मुंदडा यांचे मतदारसंघातील प्रत्येक प्रश्नावर लक्ष असून, त्यांनी स्वतः हुन याबाबत शासनाला प्रस्ताव पाठवून दिलेले आहेत. त्यास मंजुरी मिळणे आवश्यक असल्याने काल मंगळवारी दि.१८आ.नमितताताई मुंदडा सभागृहात बोलताना म्हणाल्या की, राज्यातील शासकीय इमारतींचे बांधकाम हे पारंपरिक आणि जुन्या स्वरूपाचे आहेत, म्हणून राज्यातील शासकीय इमारतींच्या बांधकामासाठी नवीन डिझाईन तयार करण्याची गरज असल्याचे सांगितले. अंबाजोगाई येथे व्हीआयपी विश्रामगृहासाठी १ हजार ३८१ लक्ष व केज येथे १ हजार ३३० लक्ष रुपये असे अंदाजपत्रक सादर केले होते. तर त्या अंदाजपत्रकास मान्यता देऊन लवकरात लवकर निधी उपलब्ध करून देण्याची विनंती केली. तसेच केज विधानसभा मतदार संघातील तांडे आणि वस्तीवरील रस्त्यांना ग्रामीण मार्ग क्रमांक नसल्याने ते कोणत्याही योजनेत बसत नाही. आणि आ. मुंदडांनी वेधले.



त्यांच्या मजबुतीकरणाचे काम होऊ शकले नाही. म्हणून त्यांना मार्ग क्रमांक देण्याची विनंती केली. केज विधानसभा मतदारसंघातील राज्यमार्ग व प्रमुख जिल्हा मार्ग यांमध्ये सुधारणा करणे आवश्यक असल्याचे मत मांडले तर केज नगरपंचायतीचे नगरपालिकेत रूपांतर व्हावे तसेच नेकनुर येथे ग्रामपंचायतीचे नगरपंचायतमध्ये मध्ये रूपांतर व्हावे, या संदर्भात प्रस्ताव दाखल केला असून त्याला मान्यता देण्याची विनंती केली. दिवसेंदिवस अंबाजोगाई शहराचा विस्तार वाढत आहे. आणि वाढत्या विस्तारामुळे अंबाजोगाई शहराची हद्द अपूर्ण पडत आहे. तर या हद्दवाढीचा प्रस्ताव देखील सादर केलेला आहे. आणि या प्रस्तावाला मान्यता मिळावी, अशी विनंती केली. राज्यातील नगरपालिकांमधून सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीनंतरचे देय रकमा थकीत आहेत. या देय रकमांची मागणी संचित पोर्टलवर करण्यात आलेली आहे. त्यास देखील मंजुरी देऊन निधी उपलब्ध करून देण्यात यावा, अशी विनंती केली आहे. याकडे लक्ष वेधून घेतले आहे.

# मातृभूमीची सेवा करण्यासाठी भूमीपुत्रांनी पुढे यावे : अशोक राठोड

## बंजारा ध्वजस्तंभ व संत श्री सेवालाल महाराज चौक लोकार्पण सोहळा

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील पौळाचीवाडी (मोठा तांडा) येथे होलीकोत्सवानिमित्त बंजारा सेवा फाउंडेशन आयोजित व्दितीय ग्राम कृतज्ञता सोहळा उत्साहात संपन्न झाला. यावेळी सामाजिक कार्यकर्ते साहेबराव राठोड यांच्या हस्ते गोर बंजारा ध्वजस्तंभ लोकार्पण व संत श्री सेवालाल महाराज चौक नामकरण सोहळा फाउंडेशनचे सदस्य, ग्रामस्थ यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. मातृभूमीच्या विकासासाठी समाज बांधवांनी संघटीत होऊन सामाजिक विधायक कार्य करावे या उद्देशाने प्रेरित होऊन बंजारा सेवा फाउंडेशनची स्थापना करण्यात आलेली असून दरवर्षी फाउंडेशनमार्फत तांड्यात होळीनिमित्त एकत्र येऊन लोकोपयोगी कार्य केले जाते. यावर्षी एकवीस फुट ध्वजस्तंभ उभारण्याचे कार्य केले. उभारलेला स्तंभ पाहून ग्रामस्थांनी ध्वजस्तंभाभोवती फेर धरून पारंपारिक लेंगीनृत्य सादर केले.



यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना बंजारा सेवा फाउंडेशनचे संचालक कवी संदीप राठोड यांनी सांगीतले की, तरुणांनी संत सेवालाल महाराजांचे विचार आत्मसाद करावे. जो ध्वज हातात घेऊन सदगुरू सेवालाल महाराजांनी विखूरलेल्या बंजारा समाजाला एकत्र करून मानवतेची शिकवण दिली, ज्या ध्वजाने धर्म रक्षण्याचे धडे दिले त्या ध्वजाचे अनावरण सर्वांच्या योगदानाने पूर्ण झाले ही गोष्ट भावी पिढीला नक्कीच दिशादर्शक ठरेल असा आशावाद त्यांनी व्यक्त केला.

फाउंडेशनची योग्य दिशेने वाटचाल चालू आहे. फाउंडेशनच्या निश्चार्थ कार्यामुळे तांडा आपल्याकडे खूप आशेने पाहत आहे. मातृभूमीची सेवा करण्यासाठी भूमीपुत्रांनी पुढे यावे असे अवाहन कार्यक्रमाचे अध्यक्ष अशोक राठोड यांनी केले. ज्येष्ठ नागरीकांनी फाउंडेशनचे कौतुक करून शुभाशीर्वाद दिले. तुमच्या सत्कार्यात आम्ही सोबत आहोत याची ग्वाही दिली. वडीलधाऱ्यांनी दिलेली ही कौतुकाची थाप पुढील कार्यास उत्साह देणारी आहे असे प्रतिपादन दिलीप राठोड यांनी केले. यावेळी भिवा राठोड, विजय राठोड, पवन राठोड, शरद राठोड व भारत राठोड यांचा उत्कृष्ट कार्याबद्दल विशेष सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिन राठोड यांनी केले तर आभार सतिश राठोड यांनी मानले.

यावेळी राजन राठोड, प्रकाश राठोड, राजु वडते, अमोल राठोड, अजय चव्हाण, विकास जाधव, रवि राठोड, बाळासाहेब जाधव, अनिल राठोड, रवि धारू राठोड, विशाल राठोड, वसंत वडते, एकनाथ राठोड, जगन राठोड, शंकर राठोड, बाबुराव राठोड, रघुनाथ राठोड, विष्णू राठोड, दिलीप चव्हाण, उत्तम राठोड, शेषेराव राठोड, कृष्णा चव्हाण, अशोक नंदराम राठोड, रावसाहेब राठोड, बाजीराव राठोड, देवसिंग राठोड, अंबादास राठोड, छगन राठोड, गोविंद राठोड, जालींदर चव्हाण तसेच ग्रामस्थ मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# हज़रत बंदगी मियाँ सय्यद शाह आलम (र.अ.) यांचा बहरे आम व उर्स

बीड । प्रतिनिधी

शहरातील मोमीनपुरा बायपास लगत असलेल्या महेदवीया दायरा कब्रस्तान मधील दर्गाह हजरत सय्यद शाह आलम (र.अ.) यांचा बहरे आम व उर्स महेदवीया समाज अनुक्रमे १९ व २० मार्च २०२५ रोजी साजरा करणार आहे.

दरवर्षीप्रमाणे यावर्षीही इस्लामिक कॅलेंडरनुसार १८ व १९ रमजान म्हणजेच यावेळी १९ व २० मार्च बुधवार आणि गुरुवार रोजी अनुक्रमे बहरे आम व उर्स साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्ताने महेदवीया समाजाचे पीर ओ मुर्शिद, ख़ादीम व मुरीद महाराष्ट्रासह तेलंगाना, कर्नाटक या राज्यांसह भारतभरातील अनेक राज्यातून येथे येतात. यावेळीही हज़रत बंदगी मियाँ सय्यद शाह आलम (र.अ.) यांचा बहरे आम व उर्स महेदवीया समाज साजरा करणार आहे. अशी माहिती महेदवीया समाजाचे विश्वस्त तथा मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ, मुहम्मद इस्हाक, मुहम्मद इरशाद, मुहम्मद इमरान, एम.ए. रऊफ, शेख वसीफ, शेख वासेख़, शेख लईख, शेख नुबैद, शेख यमन, मुहम्मद शाह शरीफ, मुहम्मद हनीफ, मुहम्मद इकबाल, मुहम्मद फताउद्दिन, शेख शारीक,




मुहम्मद मुसा, शेख फरदीन, शेख नसीर, शेख फैजान, मोमीन नुरोद्दीन, मोमीन एजाज, मुहम्मद अन्वर, मोमीन अफरोज, मुहम्मद शब्बीर, मोमीन सैफुद्दीन, मोमीन समीयोद्दीन, मुहम्मद अब्दुल गफ्फार, मोमीन अश्फाक, मोमीन मोहसीन, मुहम्मद बदरोद्दीन, मोमीन अश्फाक, मोमीन जुनैद, अब्दुल कदीर खान, आमिर खान, सोहेल खान यांनी दिली आहे.





चौसाळा – येथील शेख अमन सलीम वय वर्षे ११व शेख अर्श याने वयाच्या १०व्या वर्षी आपल्या आयुष्यातील पहिला रोजा पूर्ण केला. त्याबद्दल नातेवाईकांकडून अभिनंदन करण्यात आले.



बोरफडी/मोहंगिरवाडी येथे काल शिवसंग्राम युवक जिल्हाध्यक्षपदी सुनील कुटे यांची निवड झाल्याबद्दल ग्रा.प.कार्यालय व समस्त गावकरी मंडळींकडून त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. याप्रसंगी सरपंच, सदस्य प्रतिष्ठित मंडळी उपस्थित होते.

# राजर्षी शाहू विद्या मंदिर शाळेत स्वयंशासन दिन उत्साहात साजरा

केज । प्रतिनिधी

केज शहरातील स्वामी दयानंद प्रतिष्ठान संचलीत राजर्षी शाहू विद्या मंदिर शाळेत स्वयंशासन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी शाळेचे पूर्णवेळ कामकाज शाळेतील इयत्ता सातवीच्या विद्यार्थी –विद्यार्थिनींनी पार पाडले.शालेय प्रशासनाचा अनुभव येण्यासाठी तसेच नेतृत्वगुण विकसित होऊन नियोजनाचे धडे मिळावेत यासाठी दरवर्षी स्वयंशासन दिनाचे आयोजन शाळेत करण्यात येते.

सर्वप्रथम क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती चाटे बी.बी.व विद्यार्थिनी मुख्याध्यापिका यांनी पुष्पहार घालूनअभिवादन केले व शालेय कामकाज सुरु केले. शाळेतील पहिली ते सहावीच्या विद्यार्थ्यांसाठी अध्यापन करण्यात आले व शिक्षकांप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. स्वयंशासन दिनाच्या निमित्ताने आपल्याच सहकारी बालमित्रांना शिकवण्याचा अनुभव मिळतो व कायमस्वरूपी एक गोड आठवण राहते.

स्वयंशासन दिनाची विद्यार्थिनी मुख्याध्यापिका म्हणून कु.अनुजा तिडके हिने काम पहिले. कार्यक्रमाच्या शेवटी मुख्याध्यापिका श्रीमती चाटे बी.बी.व सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व कार्यक्रमाचा समारोप केला. या उपक्रमाबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री.राहुल देशमुख, सचिव श्री.गदळे जी.बी.व शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री.अशोक डांगे यांनी शाळेच्या मुख्याध्यापिका, सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्वश्री यादव व्ही.बी., देशमुख ए.डी., क्षीरसागर आर.एस. डिरंगे जी.बी., मस्के जे. आर., श्रीमती ध्वजा गायकवाड व श्रीमती अनिता जाधव यांनी परिश्रम घेतले.

# डॉ. संजय तांदळे यांचा पोलीस प्रशासनाच्या वतीने सत्कार



बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील सामाजिक कार्यकर्ते डॉ. संजय तांदळे यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत पोलीस प्रशासनाच्या वतीने मंगळवार दिनांक १८ रोजी वाहतूक शाखेच्या पोलीस स्टेशनमध्ये यथोचित सत्कार करण्यात आला.

बीड शहरातील मित्र नगर भागातील रहिवासी असलेले सामाजिक कार्यकर्ते डॉ. संजय तांदळे हे मागील काही वर्षांपासून सामाजिक कार्य करत आहेत. बीड आणि परिसरात काही अपघात झाल्याची माहिती मिळताच ते संबंधित पोलीस स्टेशनला कळवितात नुसतं कळवून थांबत नाहीत तर पोलिसांच्या व मित्रांच्या मदतीने लागली तातडीने घटनास्थळी भेट देऊन संबंधितांना मदत करण्याचं काम करतात त्यांच्या या कार्यामुळे शेकडो अपघातग्रस्तांना तातडीची मदत मिळाली आहे. तर अनेक जणांचे प्राण वाचले आहेत. तसेच इतर बीड शहरातील गोरगरीब आणि निराधार लोकांना स्वखर्चातून मदत उपलब्ध करून देतात. शहरातील मनोरुग्ण व्यक्तींचं पोलिसांच्या सहकार्याने पुनर्वसन करून त्यांना चांगले जीवन जगण्यासाठी मोठा आधार दिला आहे. त्याचबरोबर बीड शहरातील विविध सामाजिक उपक्रमात त्यांचा हिरीरीने सहभाग असतो.

सामाजिक कार्याबरोबरच ते निरोगी व निरामय जीवन कसे राहावे यासाठी जनतेला तसेच पोलिसांना योगाचे प्रशिक्षण देण्याचे काम करत आहेत. त्यांच्या या सामाजिक उपक्रमाची दखल घेऊन पोलीस प्रशासनातील जिल्हा वाहतूक शाखेचे प्रभारी सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. सुभाष सानप, पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक शेख उस्मान यांनी दखल घेऊन मंगळवार दिनांक १८ रोजी सुभाष रोड येथील वाहतूक शाखेच्या पोलीस स्टेशनमध्ये शाल श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार करून त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी पोलीस हवालदार श्रीकांत पाखरे, शिवदास घोलप, चालक संतोष हारके, जलदूत बाजीराव ढाकणे आदी उपस्थित होते.

**पोलीस प्रशासनाकडून झालेला सत्कार पुढील कार्यास प्रेरणा देणारा –डॉ. संजय तांदळे**

पोलीस प्रशासनाकडून आज माझ्या कामाची दखल घेऊन माझा यथोचित सन्मान केला. हा सन्मान म्हणजे खऱ्याखुऱ्या कामाची आणि प्रामाणिक कार्याची मला पावती मिळाली असल्याची भावना यावेळी डॉ संजय तांदळे यांनी व्यक्त केली.

# पुरंदर विमानतळास आद्य क्रांतिवीर राजेउमाजी नाईक यांचे नाव द्या : दौलतनाना शितोळे

बीड । प्रतिनिधी

आद्यक्रांतिवीर राजे उमाजी नाईक यांचे नाव पुरंदर विमानतळास देण्यात यावे या मागणीसाठी जय मल्हार क्रांती संघटना मराहाष्ट्र राज्य यांच्या वतीने शुक्रवार दिनांक २१ मार्च २०२५ रोजी पुरंदर (सासवड) तहसील कार्यालय समोर एक दिवसीय ठिय्या आंदोलन करण्यात येणार आहे.

राज्यातील सर्व जय मल्हार क्रांती संघटनेचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते, रामोशी, बेरड, बेडर व बहूजन समाज बांधवांनी हजारोंच्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन जय मल्हार क्रांती संघटनेचे संस्थापक अध्यक्ष दौलतनाना हारूबाई उमाजी शितोळे राष्ट्रीय अध्यक्ष यांनी केले आहे.



# तेजस्विनी ग्रुपचा रंग बरसे कार्यक्रम; रंगाची उधळण करत महिलांनी जिंकली बक्षिसे

## अध्यक्षा सोनल पाटील यांच्या ग्रुपला शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, मंजू मुळूक यांचे सहकार्य

बीड । प्रतिनिधी

येथील तेजस्वीनी ग्रुपच्यावतीने रंग बरसे हा कार्यक्रम धुलीवंदनाच्या दिवशी घेण्यात आला. यात शहरासह तालुक्यातील अनेक महिला, तरूणी, लहान मुलींनी सहभाग घेतला. रंगाची उधळण करत दिवसभर महिलांनी आनंद लुटला. तसेच वेगवेगळ्या स्पर्धेतील विजेत्यांना आकर्षक बक्षिसेही देण्यात आली. ग्रुपच्या अध्यक्षा सोनल पाटील यांना शिवसेना जिल्हा प्रमुख सचिन मुळूक, मंजू मुळूक यांनीही सहकार्य केले. फिल्मसीटीचे कोरीओग्राफर सॅड्रीक डिसुजा हे या कार्यक्रमाचे खास आकर्षण होते.



बीड शहरातील रामकृष्ण लॉन्स येथे १४ मार्च रोजी धुलींवदानाच्या दिवशी तेजस्विनी ग्रुपच्यावीने रंग बरसे हा कार्यक्रम आयोजित केला होता. चुल आणि मुल एवढेच पाहणाऱ्या महिलांसाठी हा कार्यक्रम खास आयोजित केला होता. महिलांना हक्काचे व्यासपिठ उपलब्ध करून देण्याचा हा प्रयत्न होता. याला अध्यक्षा सोनल पाटील यांना यश आले. या आगोदरही वेगवेगळे कार्यक्रम घेऊन महिलांना व्यासपिठ उपलब्ध करून दिले आहे. या कार्यक्रमात शेकडो महिलांनी सहभाग नोंदवत दिवसभर आनंद घेतला. या कार्यक्रमासाठी माजी नगराध्यक्षा डॉ.दीपाताई क्षीरसागर, आशाताई वरपे, जयाताई विधाते, संध्याताई राजपूत आदींची प्रमुख उपस्थिती होती.

**डीजेवर गाणे अन् महिलांचे नृत्य**

हा कार्यक्रम खास महिलांसाठीच होता. त्यामुळे त्यांनी मनसोक्त आनंद लुटला. डीजेवरील मराठी, हिंदी गाण्यांवर महिलांनी नृत्य करतानाच रंगाचीही उधळण केली. सलग दुसऱ्या वर्षी असा कार्यक्रम तेजस्विनी ग्रुपने घेतला.

**वेलकम ड्रींक अन् बरंच काही**

महिलांनी कार्यक्रमाच्या ठिकाणी प्रवेश करताच त्यांना वेलकम ड्रींक देण्यात आली. त्यानंतर दिवसभर आनंद लुटल्यानंतर थकलेल्या महिलांसाठी खास जेवणाचीही सोय करण्यात आली होती.

**सचिन मुळूक, मंजू मुळूक यांचेही सहकार्य**

तेजस्विनी ग्रुपने आयोजित केलेल्या या कार्यक्रमात शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक आणि त्यांच्या पत्नी मंजू मुळूक यांनीही सहकार्य करण्याबरोबरच सहभागही नोंदविला. सचिन मुळूक यांनी या कार्यक्रमाचे स्वागत करत अशाप्रकारच्या कार्यक्रमांची गरज असल्याचे सांगितले.

**डिसुजासोबत महिलांचेही नृत्य**

फिल्म सिटीचे कोरीओग्राफर सॅड्रीक डीसुजा यांनी यावेळी नृत्य केले. जोडी नृत्यासोबतच इतर स्पर्धा घेण्यात आल्या. त्यांना बक्षिसही दिले. परंतू डीसुजा यांच्यासोबत बीडच्या महिलांनी वेगवेगळ्या गाण्यांवर नृत्य करत जल्लोष केला. तसेच काही महिला, तरूणींनी राधा–कृष्णाचीही वेशभूषा परिधान केली होती.

तसेच राज बेलदार्स कन्स्ट्रक्टशन आणी डेव्होल्पर्स चे संचालक हक्कानी,रब्बानी इरफान शेख गोल्डन फोटो स्टुडिओच्या संचालिका स्नेहल माळी, सेवन हेवण मॉल च्या शीतल राजपूत, जयअंबे ब्युटी शॉपी चा भाग्यश्री गायकवाड, राया ड्रायफ्रुट चे भूषण दारेवार, कालिका बंगल्स च्या अंजली व प्रांजली कोळपकर, साई इमिटेशन ज्वेलरी चे अनिल गुंगे, तसेच अश्विनी जाधव, शिल्पा मोहिते आणी स्नेहा पारगावकर आणी सुरेखा औटी या सर्वांनी तेजस्विनी ग्रुप चा रंग बरसे हा प्रोग्राम यशस्वी होण्यासाठी मोलाचे सहकार्य केले.

# भ्रष्ट मुख्याधिकारी निता अंधारे यांची तत्काळ बदली करा

## नगरसेवकांचे शिष्टमंडळ आंदोलनाच्या पवित्र्यात

बीड । प्रतिनिधी

नगर परिषद बीड भ्रष्ट मुख्याधिकारी निता अंधारे यांच्या अनागोंदी कारभाराची सर्वत्र चर्चा होत असून भ्रष्टाचाराचा हिमालय सर करणाऱ्या मुख्याधिकारी निता अंधारे या अग्रस्थानी राहिल्या आहेत. शहरात प्रचंड अस्वछतासह नागरी समस्याच्या विळख्याने संबंध शहराला घेरले असून मुख्याधिकारी निता अंधारे यांना त्यांचे काही देणे घेणे नसून हम करे वो कायदा अशी सध्या त्यांची मनमानी सुरु असून दोन वर्षाच्या कार्यकाळात पाणी पुरवठा, बांधकाम विभाग, विद्युत विभाग, सह इतर विभागात मोठा भ्रष्टाचार झाला आहे.




येत्या आठ दिवसात मुख्याधिकारी निता अंधारे यांची बद्दली करण्यात आली नाही तर आम्ही २९ मार्च पासून सर्व माजी नगरसेवक जिल्हाधिकारी कार्यालय येथे बेमुदत धरणे आंदोलन करणार असल्याचा पवित्रा जेष्ठ नगरसेवक भिमराव वाघचौरे, नगरसेवक ॲड विकास जोगदंड यांचेसह शिष्टमंडळाने घेतला असल्याचे दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातुन सांगितले आहे.

मुख्याधिकारी निता अंधारे यांच्या विरोधात सर्वसामान्य नागरिकांत रोष निर्माण झाला आहे. त्यांच्या बदलीची सर्वस्तरातून मागणी होत आहे. या जन मागणीचा आदर करत बीड शहराला मुख्याधिकारी यांच्या जाचातून सुटका मिळावी यासाठी भ्रष्ट कारभाराची पार्श्वभूमी असलेल्या निता अंधारे यांची तात्काळ बदली करण्यात यावी अशी मागणी जेष्ठ नगरसेवक भिमराव वाघचौरे, ॲड विकास जोगदंड, मा. नगरसेविका सौ पुजाताई वाघमारे, सौ रत्नमालाताई दुधाळ, सौ.मिनाताई लांडगे सह बाबुराव दुधाळ, गणेश वाघमारे, बिबिशन लांडगे आदींच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे.

# महिलेचा विनयभंग करणाऱ्यांविरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र दाखल

## तलवाडा पोलिस ठाण्याचे सपोनि सोमनाथ नरके यांची कामगिरी

गेवराई । प्रतिनिधी



पैशाच्या कारणावरून दोघांनी महिलेचा विनयभंग केला. याप्रकरणी तलवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल होताच दोन्ही आरोपींना अटक केली. तसेच फिर्यादी साक्षीदार यांचे जबाब नोंदवीत अवघ्या २४ तासात गेवराई न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

गेवराई तालुक्यातील जातेगाव येथील आठवडी बाजारासाठी पीडित महिला आली होती. तिच्या पतीने हरिनारायण उर्फ नारायण पांडुरंग कोकाट (वय ४०) व सुग्रीव मदन पांढरे (वय ३८ दोघेही रा. ठाकर आडगाव, ता.गेवराई) यांच्याकडून १० हजार रुपये उसने घेतले होते. पीडितेच्या पतीकडे वारंवार पैशाची मागणी केली. तरीही त्यांनी पैसे दिले नाहीत. सोमवारी या दोघांनीही पीडीतेला गाठले. आमचे १० हजार रुपये परत द्या, अन्यथा शरीरसुख द्या, अशी मागणी त्यांनी केली. यावर पीडितेने नकार देत तातडीने तलवाडा पोलीस ठाणे गाठत तक्रार दिली. गुन्हा दाखल होताच तलवाडा पोलिसांनी दोघांनाही अटक केली.

तसेच पंचनामा, साक्षीदारांसह फिर्यादीचे जबाब नोंदवून मंगळवारी दुपारी २ वाजता गेवराई न्यायालयात आरोपींविरुद्ध आरोपपत्र दाखल केले. ही कामगिरी पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपअधीक्षक राजगुरू यांच्या मार्गदर्शनाखाली तलवाडा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सोमनाथ नरके, पोलीस उपनिरीक्षक स्वप्निल कोळी, सफौ विठ्ठल राठोड, भगवान खाडे, नारायण काकडे, सुग्रीव रुपनर, मीना घोडके आदींनी केली.

# अठरापगड जातींना सोबत घेऊन आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका लढणार : राजेंद्र मस्के

बीड । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने सामाजिक न्याय विभागाची बैठक राष्ट्रवादी भवन बीड येथे पार पडली, यावेळी सामाजिक न्याय विभागाचे प्रांत अध्यक्ष श्री पंडित कांबळे सर यांच्या उपस्थितीत बैठक बोलण्यात आली होती. यावेळी मराठवाड्याच्या सर्व जिल्ह्यातून प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

यावेळी बीड जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के असे म्हणाले की, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष हा शरदचंद्र पवार यांच्या विचारधारेवर चालतो त्यांनी अठरापगड जातींना सोबत घेऊन त्यांच्या न्याय हक्कासाठी सातत्याने प्रयत्न केला आहे, मराठवाड्याच्या विद्यापीठाला डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देण्यासाठी



पुढाकार घेणारा नेता म्हणून पवार साहेबांची ओळख आहे,नामांतरांच्या वेळेला राजकीय किंमत मोजावी लागली तरी चालेल परंतु मराठवाडा विद्यापीठाला डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देण्याचे काम पवार साहेबांनी केले आहे, पवार साहेब नेहमीच पुरोगामी विचार जोपासणारा नेता आहे अशा नेत्याच्या नेतृत्वाखाली आपण सर्व सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करतो, येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांमध्ये देखील वंचित समाजाला प्रतिनिधित्व देण्याचे काम राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष करणार असल्यास मत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी व्यक्त केले,

यावेळी प्रांताध्यक्ष श्री पंडित कांबळे सर यांनी असे सांगितले की माझ्यासारख्या सामान्य कुटुंबातील व्यक्तीला पवार साहेबांनी सामाजिक न्याय विभागाची जबाबदारी दिली आहे, ती योग्यरित्या मी पार पाडत आहे श्री कांबळे यांनी बाळासाहेब शिनगारे यांना जिल्हा कार्याध्यक्षाची जबाबदारी दिली होती, त्यांचे काम पाहून बाळासाहेब शिनगारे यांची सामाजिक न्याय विभागाच्या बीड जिल्हाअध्यक्ष पदाचे नव्याने घोषणा केली आहे. बाळासाहेब शिनगारे हे बीड जिल्ह्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष वाढवण्यासाठी दिनदलित वंचित घटकांना एकत्र करून पवार साहेबांचे हात बळकट करणार आहेत, अशा भावना श्री कांबळे यांनी व्यक्त केल्या.

# सिरसाळा येथील विशाल आरगडे यांच्याविरूध्द एमपीडीए

बीड । प्रतिनिधी

जिवे मारण्याच्या धमक्या देणे, अवैध शस्त्र बाळगणे, कर्मचाऱ्यांवर हल्ला करणे, दंगा करणे यासह इतर गंभीर स्वरूपाच्या ९ गुन्ह्याची नोंद असलेल्या विशाल लक्ष्मण आरगडे (रा. पोहनेर रोड सिरसाळा ता. परळी) याच्याविरूध्द एमपीडीएची कारवाई करण्यात आली आहे.

बीड पोलीस अधिक्षक नवनीत काँवत यांनी गुंडांविरूध्द कारवाईची मोहिम हाती घेतली आहे. त्यास जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांची साथ लाभत असल्याने अनेक गुंडांविरूध्द एमपीडीएची कारवाई करण्यात येत आहे. परळी तालुक्यातील सिरसाळा येथील विशाल लक्ष्मण आरगडे याच्याविरूध्द जिवे मारण्याच्या धमक्या देणे, अवैध शस्त्र बाळगणे, कर्मचाऱ्यांवर हल्ला करणे, दंगा करणे यासह इतर गंभीर स्वरूपाच्या ९ गुन्ह्यांची नोंद पोलीस अभिलेखावर आहे. त्याच्याविरूध्द यापुर्वी प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली. मात्र त्याने या कारवाईला न जुमानता चढत्या क्रमाणे गंभीर गुन्हे करणे चालूच ठेवले होते. त्या अनुषंगाने सिरसाळा पोलीसांनी त्याच्याविरूध्द एमपीडीए कारवाई अंतर्गत प्रस्ताव पोलीस अधिक्षक बीड यांच्यामार्फत जिल्हादंडाधिकारी यांच्याकडे सादर केला होता. या प्रकरणात जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी विशाल आरगडे याच्याविरूध्द एमपीडीए कारवाईचा आदेश पारित केला असुन दि. १८ मार्च रोजी बीड शहरातून विशाल आरगडे याला ताब्यात घेऊन सिरसाळा ठाण्यात हजर करण्यात आले. आज सकाळी त्याची रवानगी छत्रपती संभाजीनगर येथील हर्सूल कारागृहात करण्यात आली आहे. सदरची कामगिरी पोलीस अधिक्षक नवनीत काँवत, अंबाजोगाईच्या अप्पर पोलीस अधिक्षक चेतना तिडके, स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि.उस्मान शेख, सपोनि गोरखनाथ दहिफळे, युवराज चव्हाण, बळीराम राठोड यांच्यासह सपोउपनि अभिमन्यु औताडे, पो.ह. निलेश ठाकुर, पो.अं. गणेश हांगे, बिभीसेन चव्हाण यांनी केली.

# गेवराई तालुक्यातील १५८ गावात पोलीस पाटीलच नाही!

## पोलीस व महसूल प्रशासनाला करावी लागते तारेवरची कसरत

गेवराई । प्रतिनिधी

गावातील पोलीस पाटील हा पोलीस व महसूल प्रशासनातील महत्वाचा दुवा समजला जातो. गावखेड्यातील बहुतांशी कामात पोलीस पाटलांची मदत घेतली जाते. असे असताना देखील गेवराई तालुक्यातील तब्बल १५८ गावात पोलीस पाटीलच नसल्याची बाब समोर आली आहे. परिणामी पोलीस व महसूल प्रशासनाला तारेवरची कसरत करावी लागत आहे.

गावातील सरपंच याप्रमाणेच पोलीस पाटील एक महत्वाचे पद आहे. त्यांच्या खांद्यावर विविध जबाबदारीचे ओझे आहे. महसूल विभागाचा काही कार्यक्रम असला की, पोलीस पाटलास कामाला लावले जाते. याशिवाय गावातील कायदा व सुव्यवस्था बिघडल्यास पोलिसांना पोलीस पाटलांची आठवण येते. पोलीस पाटलांना देखील वेळेचे बंधन नसल्याने रात्रंदिवस त्यांना आपली जबाबदारी पार पाडावी लागते. दरम्यान गेवराई तालुक्यात एकूण जवळपास १९० महसूली गावे आहेत. शिवाय तीन पोलीस ठाणे असून, यात गेवराई पोलीस कार्यक्षेत्रातील १२ गावात पोलीस पाटील कार्यरत आहे. मात्र ६२ गावे पोलीस पाटलाविना आहेत. चकलांबा पोलिस ठाणे हद्दीतील तीनच गावात पोलीस पाटील आहेत. ४५ गावातील पोलीस पाटलांचे पद रिक्त असून तलवाडा पोलीस ठाणेंतर्गत १५ गावात पोलीस पाटील आहेत तर ५१ गावे पोलिस पाटलाविना आहेत.




### आरक्षण सोडतीला वर्ष लोटले

बीड जिल्ह्यातील गावातील पोलीस पाटील पदाची आरक्षण सोडत होऊन एक वर्ष झाले तरी प्रशासनाकडून आद्याप पोलीस पाटील भरती करण्यात आलेली नसल्याने पोलीस पाटलांची भरती करण्यात यावी, अशी मागणी होत आहे.



पोलिस पाटील यांची प्रशासनाला गाव पातळीवर नेहमीच मदत होत असते शासनाने लवकरात लवकर पोलिस पाटील यांची नेमणूक करावी. जेणेकरून गावात शांतता राखण्याचे काम पोलिस पाटील करतील व प्रशासनास हातभार लाभेल

– प्रविणकुमार बागंर,
पोलिस निरीक्षक गेवराई

# ज्ञानराधाच्या ठेवी परत मिळण्याची शक्यता

## मालमत्ता जप्तीच्या हालचाली ६०० कोटीच्या मालमत्तेचा होणार लिलाव




बीड । प्रतिनिधी

ज्ञानराधा मल्टीस्टेट को. ऑप क्रेडीट सो.लि.बीड चे बीड जिल्हयात २३ शाखा असुन सदर मल्टीस्टेट विरूद्ध बीड जिल्हयातील विविध पोलीस स्टेशनला आजपावेतो ७६ गुन्हे दाखल झाले असुन फिर्यादी मधील एकुण ४७,९९,९२,३६८/– रूपयाचा अपहार झाले बाबत तक्रारीमध्ये नमूद आहे. तसेच ज्ञानराधा मल्टीस्टेटचे आजपावेतो आर्थिक गुन्हे शाखा, बीड येथे एकुण ११५२७ ठेवीदार त्यांच्या एकुण– ६६०,१९,९९,०६९ /– रूपये रकमेची विश्वासघात व फसवणुक झाले बाबत तक्रारी व त्याबाबतचे पुरावे या शाखेत दिलेले आहेत. त्यावरून गुन्हयाचे तक्रारी मधील व प्राप्त ठेवीदार यांचे अर्ज असे एकुण – ७०८,१९,९१,४३७ /– रूपये रकमेची फसवणुक झाले बाबत माहिती आजपर्यंत प्राप्त झालेली आहे. व त्यामध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. ठेविदार यांचे तक्रारी अर्ज स्वीकारण्यासाठी आगुशा बीड येथे स्वतंत्र पथक तयार करण्यात आलेले आहे.

ज्ञानराधा मल्टीस्टेट को ऑप क्रेडीट सो.लि.बीड चे आरोपी संचालक मंडळ व इतर अधिकारी/कर्मचारी यांचे नावावर असलेल्या स्थावर व जंगम मालमत्तांची मा. नोंदणी महानिरीक्षक, यांचे कार्यालय, पुणे येथुन व स्थानिक सह दुय्यम निबंधक कार्यालयाचे बीड जिल्हयातील विविध शाखे मधुन माहिती प्राप्त केली असता सदर मल्टीस्टेट मधील चेअरमन, व्हाईस चेअरमन, संचालक मंडळ यांचे नावे असलेली स्थावर मालमत्तेची माहिती प्राप्त करुन चझखऊ प्रस्ताव पुढील कायदेशीर कारवाईसाठी जा.क्र. वाचका/आ.गु.शा./रा.म/एमपीआयडी /प्रस्ताव/२०२५–४१५ बीड दि. १७/०३/२०२५ अन्वये. मा.अपर पोलीस महासंचालक, म.रा. मुंबई यांचे कार्यालयात पाठवण्यात आलेले आहे.



सदर गुन्हयाचे तपासामध्ये चार वाहने (जीप), तीन सीपीयु व मुख्य कार्यालय बीड येथुन महत्त्वाचे दस्तऐवज असा एकुण रुपये ३२,८०,०००/– रकमेचा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच मुख्य शाखेचा पंचनामा करून ६,३४,३९०/– रोख रक्कम तसेच सारडा संकुल शाखेतुन ७३ ग्रॅम सोन व अंदाजे २५० ग्रॅम चांदीच्या मौल्यवान वस्तु जप्त केले असुन त्याची एकुण–किंमत– ३,०३,१००/–रू किंमतीचे मौल्यवान दागीने जप्त करण्यात आलेले आहे त्यांची एकुण किंमत– ४२,१७,४९० /– रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेले आहे. तसेच सदर गुन्हयामध्ये आजपावेतो संचालक मंडळातील व इतर अधिकारी कर्मचारी यांचे एकुण–२५६ बँक खाते निष्पन्न केलेले आहे. त्यापैकी चालु स्थितीत असलेले बैंक खाते ४७ आहेत त्यापैकी ४४ बैंक खाते फ्रिज केलेले असुन त्यामध्ये– ६९,२८,६३६/– रूपये फ्रिज करण्यात आलेले आहे. महाराष्ट्र ठेवीदार वित्तीय संस्थेतील हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम (चझखऊ–उढ) १९९९ अन्वये पुढील कार्यवाहीसाठी एमपीआयडी प्रस्ताव मा. अपर पोलीस महासंचालक, म.रा. मुंबई यांचे कार्यालयात पाठवण्यात आलेला आहे.

सदरची कामगिरी मा.विरेंद्र मिश्र विशेष पोलीस महानिरीक्षक छ. संभाजी नगर परीक्षेत्र, छ संभाजीनगर, मा. नवनीत कॉंवत, पोलीस अधीक्षक बीड, मा. सचिन पांडकर अपर पोलीस अधीक्षक बीड, विश्वांभर गोल्डे उपविपोअ बीड तथा पोलीस उप अधीक्षक आर्थिक गुन्हे शाखा बीड यांचे मार्गदर्शनाखाली आर्थिक गुन्हे शाखा येथील पोलीस निरीक्षक संतोष शेजाळ, सहा. पोलीस निरीक्षक, पांडुरंग भागीले सपोनि रत्नाकर घोळवे, व पोलीस अंमलदार सहा फौजदार मुकुंद तांदळे, मच्छिंद्र राख, अभिमान भालेराव, पोलीस हवालदार रामदास, विठ्ठल, पोशि. संजय पवार व इतर अंमलदार यांनी केलेली आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड–४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१–७–३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड–४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक – दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT